निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०५/०२/२०२०

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय:- ग्रामपंचायतींच्या निवडणुका...**
**संगणक प्रणालीतून नामनिर्देशनाची प्रक्रिया**
**संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १७/१०/२०१९ चे पूर्वतयारीचे आदेश**

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी संगणक प्रणालीद्वारेच नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेब साईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी करून (Register) घ्यावी व नामनिर्देशनपत्र तसेच घोषणापत्रामध्ये माहिती भरावी. (सदरची माहिती जतन करून ठेवता येऊ शकते) आवश्यक असल्यास दुरुस्ती करून त्याचे प्रिंट आऊट काढून त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करण्यात येते. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा अर्जच नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येते.

सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र, इत्यादी भरण्यात अडचण येऊ नये म्हणून तहसिलदार / निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची

(Help Desk) स्थापना करणे आवश्यक आहे व त्यासाठी हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना संगणकप्रणालीचे योग्य ते प्रशिक्षण देण्यात यावे. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीतील निवडणूक कार्यक्रमाचे नाव संबंधितांना कळवावे. सर्व ग्रामपंचायती सदर कार्यक्रमामध्ये समाविष्ट झाल्या आहेत याची खात्री करावी. तसेच संबंधित ग्रामपंचायती शोधण्यास मदत व्हावी याद्दष्टीने त्याची नावेदेखील कळवावीत.

निवडणुका असलेल्या जिल्हयातील सेतू, ई-सेवा केंद्र, संग्राम कक्ष इत्यादी जास्त क्षमतेची इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी तसेच सायबर कॅफे व सीएफसी (Community Facilitation Centre) इत्यादी ठिकाणी नामनिर्देशनपत्र भरण्याची सोय उपलब्ध ठेवावी. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे घोषणापत्र संगणकाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नमुन्यात भरून त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वत:ची स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे. अशा सूचना निवडणूक पूर्व तयारीच्या आदेशात देण्यात आलेल्या आहेत.

असे विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेले संगणकीकृत नामनिर्देशनपत्र शपथपत्रासह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्यानंतर पारंपारिक पध्दतीप्रमाणेच संगणकप्रणाली मधून देखील पुढे घेऊन जायचे आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही निवडणूक निर्णय अधिकारी सदर संगणकप्रणालीचा वापर न करता केवळ पारंपारिक पध्दतीचा वापर करतात.

आता राज्य निवडणूक आयोगाची वेबसाईटचे नूतनीकरण करण्यात येत असून सदर वेबसाईटवर Dash board ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून या dash board वर निवडणूक निकाल तात्काळ दिसणार आहे. यासाठी संगणक प्रणालीनुसार नामनिर्देशनाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती विहित कालमर्यादेत भरणे बंधनकारक आहे.

तरी संगणकप्रणालीव्दारे नामनिर्देशनाची प्रक्रिया पार पाडताना सोबत जोडलेल्या steps of transaction चे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखा व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घ्यावी.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्राप्त नामनिर्देशन पत्र व संगणकप्रणालीतील नामनिर्देशनपत्र यांची संख्या अचूक असल्याची खातरजमा संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्यास्तरावर करावी व त्याचा अहवाल संबधित तहसिलदार यांना कळवावा.

संबंधित तहलिसदार यांनी देखील प्राप्त नामनिर्देशन पत्र व संगणकप्रणालीतील नामनिर्देशनपत्राची खातरजमा करुन पुढील सर्व टप्पे व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्यादृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी.

आयोगाच्या वेबसाईटवरील Dash Board वरील निकालाची माहिती नामनिर्देशनाच्या संगणकप्रणालीवर अवलंबून असल्याने संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित तहसिलदार व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मध्ये समन्वय असावा. सदर माहिती विहित टप्प्यावर / विहित कालावधीत भरली न गेल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली जाईल याची नोंद घ्यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## Steps Of Transaction from Nomination Software

**Step I*** ➡ **(As soon as Collector Login Received)**

⬇

Creating User Master

(At **Collector Level** from Login given by SEC)- for Tahsildar

**Step 2*** ➡ **(As soon as Tahsildar Login Received)**

⬇

Creating Ward Seat Master

(At **Tahsildar Level** from Login given by Collector Office)

**Step 3*** ➡ **(As soon as Login Received)**

⬇

Creating RO Master

(Assigning Wards to each RO)

(At **Tahsildar** Level from Login given by Collector Office)

**Step 4***

⬇

Giving RO Logins to Ros

(At Tahsildar Level, as generated in **RO Credential Report**)

## Steps Of Transaction from Nomination Software

# Step 5*

**(Every day of Nomination)**

⬇

Submitting Received Nomination Forms

(At RO Level from RO Login given by Tahsildar )

# Step 6*

**(Day of Scrutiny)**

⬇

Deciding **Valid /Invalid All Nomination Forms in Scrutiny Transaction**

(At RO Level from RO Login given by Tahsildar )

# Step 7*

**(Day of Withdrawal)**

⬇

**Withdrawal of Candidature** if requested by candidates from Withdrawal Transaction

(At RO Level from RO Login given by Tahsildar )

# Step 8

**(On Symbol Allotment Day)**

⬇

**Assigning Symbol To Contesting Candidates** or

Marking **Duplicate Forms** if any
from **Symbol Allotment Transaction**
(At RO Level from RO Login given by Tahsildar )

## Steps Of Transaction from Nomination Software

### Step 9*

**( After Symbol Allotment)**

↓

Declaring Candidate **Unopposed** if any
From 'Unopposed Candidate Result Creation Transaction'
(At RO Level from RO Login given by Tahsildar )

### Step 10*

**(After Contesting Candidates List Finalized)**

↓

Filling **Polling Booth Master**
(At RO Level from RO Login given by Tahsildar )

### Step 11*

**(On Poll Day)**

↓

Filling Polling Data Booth wise from Transaction

(At RO Level from RO Login given by Tahsildar )

### Step 12*

**(On Counting Day)**

↓

Filling Counting Data from Transaction

(At RO Level from RO Login given by Tahsildar )

## Step 13*

(On Counting Day)

↓

Generating Winner Certificate from Transaction &

Handing Over Signed Certificate To Winner.

(At RO Level from RO Login given by Tahsildar )